# राजाराम माने, प्रशासकीय सदस्य, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण पुणे खंडपीठ पुणे यांचेसमोरील कामकाज.

---------

Rev. Appli. No. NS/XI/३/२०१८

| | | |
|---|---|---|
| श्री. महादेव विठोबा दळवी<br>रा. अरबवाडी, तालुका कोरेगाव, जिल्हा सातारा ४१५ ०११ | ) | अर्जदार |
| विरुध्द | | |
| श्री. बाळकृष्ण ज्ञानदेव दळवी<br>रा. अरबवाडी, तालुका कोरेगाव, जिल्हा सातारा ४१५ ०११ | ) | जाब देणार |

## न्यायनिर्णय

फेरचौकशी अर्जदार यांनी सदरचा पुनर्निरीक्षण अर्ज उपविभागीय अधिकारी कोरेगाव यांचेकडील क्रमांक अपिल/रिव्हीजन/३९/२०१७ निर्णय दिनांक २९/८/२०१८ वर नाराज होऊन दाखल केलेले आहे. उपविभागीय अधिकारी यांचेकडे दाखल अपील हे तहसिलदार कोरेगाव यांचेकडील क्रमांक ३२ग-बनवडी-९३-९४, दिनांक ११/७/१९९४ चे आदेशावर नाराज होऊन दाखल झालेले आहे. तहसिलदार यांचे निर्णयाप्रमाणे वाद जमिनीचे जमीनमालक श्री. माधव भागवत कुलकर्णी हे होते. त्यामध्ये विठू रामा दळवी व महादेव विठोबा दळवी हे कुळ या नात्याने असल्याचे दिसून येते. तहसिलदार यांनी कुळकायदा कलम ३२ ग ची चौकशी करताना जमीन मालकाचे पत्ते उपलब्ध नसल्यामुळे सदरचे कामकाज तहकूब करण्यात आले. त्यानंतर वर्तमानपत्रात जाहीरात देऊन नोटीस बजावण्यात आली व अंतिम केस क्रमांक ३२ग/बनवडी/२०४, दिनांक ३१/५/१९९५ रोजी झाली व खरेदीची किंमत ठरविण्यात आली. सदर प्रकरणी नामदेव दळवी (तेली), महादेव दळवी व बाळकृष्ण ज्ञानदेव दळवी असे तीन कुळ ठरविण्यात येऊन नामदेव व महादेव विठोबा दळवी आठ आणे व बाळकृष्ण ज्ञानदेव दळवी आठ आणे अशा प्रकारे ३२ग चे आदेश झाले.

सदर प्रकरणी झालेले अपील क्रमांक ३९/२०१७ दिनांक २९/८/२०१८ हे महादेव विठोबा दळवी यांचा फेरचौकशी अर्ज अमान्य करण्यात आलेला आहे व

तहसिलदार यांचा आदेश क्रमांक ३२ग/बनवडी/९३-९४ दिनांक ११/७/१९९४ कायम करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी फेरचौकशी अर्जदार यांचे वतीने ॲड. मुलाणी यांचा युक्तिवाद पुढीलप्रमाणे आहे. फेरचौकशी अर्जामधील पान नंबर १ वर नमूद केल्याप्रमाणे सदर घराण्याचे मुळ पुरुष रामजी असुन, त्यास विठू रामा व तुकाराम रामा अशी मुले होती. तुकाराम निर्वंश मयत झाले व विठू रामा यांना महादेव व नामदेव अशी मुले होती. त्यापैकी महादेव हे अर्जदार आहेत. सदर प्रकरणी टेनन्सी केस नं. ३२ग/बनवडी/ २०४, निर्णय दिनांक १५/१२/१९६४ मध्ये जमीनमालक व विठु रामा यांचे मध्ये तडजोड होऊन वाद जमिनीपैकी ५० टक्के जमिनीचा या आदेशान्वये ३२ग ची कार्यवाही करण्याचे आदेश झाले. त्यानुसार तुकाराम रामजी दळवी व विठू रामजी दळवी यांनी वर आदेशान्वये खरेदी केली. सदर निकालाचे वेळी जमीनमालक जिवंत होते व त्यांचा जबाबही घेण्यात आलेला आहे. तो खालील कोर्टाच्या कागदपत्रामध्ये पान १६५ वर उपलब्ध आहे. त्यामध्ये त्यांनी तुकाराम रामा व मुलगा नामदेव विठू हे मयत विठू रामा दळवी यांचे वारस कुळ आहेत असे नमूद केले आहे. उर्वरीत निम्म्या हिश्याविषयी १९९३-९४ साली प्रकरण झाले त्याचा निर्णय क्रमांक ३२ग/बनवडी/२०४, दिनांक ३१/५/१९९५ अन्वये झालेला आहे. वरील कामकाज चालताना जमीन मालकांचा पत्ता उपलब्ध नसल्यामुळे वर्तमानपत्रात जाहीर प्रसिध्दीव्दारे नोटीस देण्यात आलेली होती. त्यावेळी महादेव व नामदेव हे अर्जदार आहेत. पान क्रमांक १५५ वर नामदेव यांचा जबाब आहे, त्यामध्ये बाळकृष्ण यांचा वाद जमिनीशी काहीही संबंध नाही असे नमूद करण्यात आलेले आहे. दिनांक ८/७/१९९४ चा जबाब आहे. सदर जबाबास महादेव यांची संमती आहे. नामदेव यांनी सदर जबाबात बाळकृष्ण कुळ असल्याचे कधीही म्हटलेले नाही. एका माणसाने दोन परस्पर विरोधी जबाब दिलेले आहेत व दोन्ही पक्षकार अडाणी असल्यामुळे दिनांक ३१/५/१९९५ च्या जबाबामधील मजकूरामध्ये बाळु ज्ञानु दळवी पुतण्या असा उल्लेख केलेला आहे तो अर्जदार यांना अमान्य आहे. सदर प्रकरणी खालील कोर्टाची कागदपत्रे मागविण्यासाठी वारंवार उपविभागीय अधिकारी यांचे कोर्टामध्ये विनंती करण्यात आलेली होती परंतू त्यांनी ती मान्य केली नाही.

यानंतर पुन्हा विनंती केल्यानुसार खालील कोर्टाची कागदपत्रे मागविण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांना पत्र दिले आहे त्याप्रमाणे उपविभागीय अधिकारी यांचेकडील कागदपत्रे उपलब्ध झाली आहेत. परंतू तहसिलदार यांनी सदर कागदपत्रे उपलब्ध नसलेबाबत अहवाल दिला आहे. त्यामुळे उपलब्ध कागदपत्रांचे आधारे सदरचे प्रकरण सुरु आहे.

सदर प्रकरणी जमीनमालक यांनी विठू रामा व नामदेव विठू यांनी मूळ कुळ असलेबाबत जमीन मालक यांची मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये १९९५ साली बाळकृष्ण यांचे कुळ म्हणून नाव येण्यासाठी कोणतेही कारण नाही. सन १९९४ साली केलेल्या अर्जामध्ये सुध्दा नामदेव व महादेव यांनीच कुळ म्हणून खरेदी मागितली आहे. दिनांक ३१/५/१९९५ च्या जबाबानंतर त्याच दिवशी तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण यांनी निर्णय दिलेला आहे हे कायद्याला व वस्तुस्थितीला धरुन नाही. दिनांक ३१/५/१९९५ चा निर्णय अर्जदार यांना अमान्य असुन ते कुळ नाहीत. त्यांचेकडे ते कुळ आहेत हे दाखविण्यासाठी कोणताही पुरावा नाही. कुळकायद्यानुसार मूळ कुळ विठू रामा यांची नामदेव व महादेव ही दोन्ही वारसे कुळ ठरतील त्यामुळे त्यांचा पुतण्या म्हणून जो फेरफार (नंबर ५३२) पडला आहे त्याला कोणतीही मान्यता नाही. मा. उच्च न्यायालय मुंबई १९९७(२) Bombay CR २३०, दिनांक २६/६/१९९६ च्या संदर्भान्वये मा. उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे की, केवळ ७/१२ सदरी नोंदी आहेत ही बाब कुळकायदा हक्क दाखविण्यासाठी पुरेशी नाही. उपविभागीय अधिकारी कोरेगाव यांनी कोणतेही सबळ कारण नमूद न करता आदेश दिलेला असून तहसिलदार यांचा निर्णय रद्द केलेला आहे. वरील सर्व बाबींचे अवलोकन करुन सदरचा निर्णय रद्द करण्यात यावा व जाब देणार यांचे नाव तहसिलदार यांचे दिनांक ३१/५/१९९५ या निकालातून वर्ग करण्यात यावे.

जाब देणार यांचे वतीने बाळकृष्ण ज्ञानदेव दळवी हे स्वत: उपस्थित होते. त्यांचे वकील ॲड साळुंखे हे उपस्थित नसल्यामुळे जाब देणार हे स्वत: त्यांचे म्हणणे दाखल करीत आहेत. सदर प्रकरणातील मूळ कुळ रामजी हे होते, त्यांना तीन मुले विठू रामा, तुकाराम रामा व ज्ञानू रामा अशी नावे आहेत. विठू यांना नामदेव व

महादेव व ज्ञानू यांना बाळकृष्ण हा मुलगा होता व तुकाराम हे निर्वंश होते. सर्वजण एकत्र कुटुंबात राहात असुन तुकाराम रामा १९८८ साली व नामदेव विठू १९९८ साली मयत झाले. फेरफार नंबर ६ दिनांक १०/१२/१९८१ अन्वये वाद जमिनीस महादेव विठू दळवी एकुमें यांनी अर्ज दिला की, मला एक चुलत भाऊ बाळकृष्ण दळवी हा असुन आम्ही बरेच वर्षापासून विभक्त राहिलेलो होतो, त्यांचे ८ आणे हिश्यास नाव दाखल करावे. याप्रमाणे बाळकृष्ण ८ आणे, नामदेव ८ आणे अशी फेरफार नोंद झाली. सन १९८१-८२ साली ७/१२ सदरी जाब देणार म्हणजेच बाळकृष्ण ज्ञानदेव दळवी यांची ४ आण्यास नोंद आहे. आदेश क्रमांक ३२ग/बनवडी/१९९३-९४ निर्णय दिनांक ११/७/१९९४ चे अवलोकन करता त्यामध्ये तहसिलदार यांनी चौघांची वहिवाट असलेबाबत नोंद आहे असे नमूद करुन जमीन मालकाचे म्हणणे घेणे आवश्यक आहे असे म्हटलेले आहे व सदर कामकाज तहकूब केलेले आहे. सदर प्रकरणी जाब देणार यांना पुन्हा माहिती मिळाल्यानंतर दिनांक ३१/५/१९९५ च्या आदेशामध्ये त्यांचे नाव ४ आणे क्षेत्राला समाविष्ट आहेत व तो निर्णय योग्य आहे. सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी यांचेकडे झालेले अपील अमान्य करुन जाब देणार यांचे नावे नोंद झालेला खालील कोर्टाचा आदेश कायम केलेला आहे व तो योग्य आहे व त्यामध्ये कोणताही बदल करण्यात येऊ नये व फेरचौकशी अर्जदार यांचा अर्ज काढून टाकण्यात यावा अशी विनंती जाब देणार यांचे वतीने करण्यात आली.

प्रस्तुत प्रकरणातील खालील कोर्टाची कागदपत्रे आणि अर्जदार व जाब देणार यांचे युक्तिवाद यांचे अवलोकन करता केस क्रमांक ३२ग/बनवडी/२०४, निर्णय दिनांक ३१/५/१९९५ प्रकरणी नामदेव विठ्ठल दळवी यांचा दिनांक ३१/५/१९९५ चा जबाब पाहता सदर गावच्या फेरफार क्रमांक ५३२ अन्वये वाद जमिनीचे मूळ संरक्षित कुळ विठू रामा तेली यांना नामदेव विठोबा दळवी (तेली), माधव विठोबा दळवी, सावित्रीबाई विठोबा दळवी सध्या मयत व बाळा ज्ञानू तेली (पुतण्या) असे वारस असल्याचे स्पष्ट नमूद आहे. सदर बाबीवर आधारीत तहसिलदार यांचा निर्णय क्रमांक ३२ग/२०४/बनवडी, दिनांक ३१/५/१९९५ पारित केलेला आहे. सदर निर्णयावर उपविभागीय अधिकारी यांचेकडे झालेल्या

अपिलामध्ये अपिलार्थी यांनी नोंद क्रमांक ५३२ अमान्य केलेली नाही. किंबहुना बाळा ज्ञानु दळवी हे संरक्षित कुळ विठु रामा दळवी यांचे वारस आहेत ही बाब निर्विवाद आहे. (नोंद क्रमांक ५३२) त्यामुळे तहसिलदार यांनी दिलेला निर्णय व उपविभागीय अधिकारी यांनी त्यावरील अपील अमान्य केलेचा निर्णय योग्य असुन त्यामध्ये हस्तक्षेप करण्याचे कारण दिसून येत नाही या निष्कर्षाप्रत येऊन पुढीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**आ दे श**

१) पुनर्निरीक्षण अर्ज अमान्य करण्यात येत आहे.

२) उपविभागीय अधिकारी कोरेगाव यांचेकडील क्रमांक अपिल/रिव्हीजन/३९/२०१७ निर्णय दिनांक २९/८/२०१८ रोजी पारित केलेला आदेश कायम करण्यात येत आहे.

३) सदर निकालाची समज उभय पक्षकारांना देण्यात यावी.

४) खालील कोर्टाचे अभिलेख संबंधितांना परत करण्यात यावेत.

कौन्सिल हॉल, पुणे १
दिनांक : ०१/०४/२०२२

**( राजाराम माने )**
**प्रशासकीय सदस्य**
**महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण,**
**खंडपीठ पुणे.**